## राज्य शिक्षण व संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२२ -२३

**नवोपक्रम कर्ता**

**सौ माधवी मुकुंद शिनगारे**

एम ए- (मराठी) ,एम ए (शिक्षण शास्त्र) डीएड, बीएड, सेट (मराठी, शिक्षणशास्त्र) पीएचडी सुरू

**मार्गदर्शिका**

**श्रीमती विद्या प्रवीण यादव**

(मुख्याध्यापिका ,प्रिन्स शिवाजी विद्यालय)

**नवोपक्रमाचे शीर्षक**

# स्मार्ट शब्दांजली

**शाळा -ताराराणी विद्यापीठाचे, प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर.**

**सन-२०२२**

# माझी ओळख



**नाव- सौ. माधवी मुकुंद शिनगारे (स.शिक्षिका)**

**शाळा- ताराराणी विद्यापीठाचे, प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर.**

**शैक्षणिक अर्हता- एम. ए.(मराठी), एम. ए.( शिक्षण शास्त्र), डी.एड., बी.एड., डी.एस.एम., सेट -(मराठी) सेट- (शिक्षण शास्त्र) पीएचडी ( सुरू आहे )**

**नोकरी सुरू तारीख- ८ मार्च २००७**

**एकूण सेवा काल- १५ वर्षे**




**S- Student**

**M- Makes**

**A-All-rounder**

**R- Researcher**

**T- Talented**

# शब्दांजली

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | नवोपक्रमाच्या पायऱ्या |
| --- | --- |
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक |
| २ | नवोपक्रमाची गरज व महत्त्व |
| ३ | नवोपक्रमाची उद्दिष्टे |
| ४ | नवोपक्रमाचे नियोजन |
| ५ | नवोपक्रमाची कार्यपद्धती |
| ६ | नवोपक्रमाची यशस्विता |
| ७ | समारोप |
| ८ | संदर्भसूची व परिशिष्टे |

१५.राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पारितोषिके व उत्तेजनार्थ बक्षीसपात्र स्पर्धकांनी आपल्या नवोपक्रम अहवालाची एक प्रत संशोधन विभागाकडे कार्यक्रमाच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील.

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. सौ. माधवी मुकुंद शिनगारे प्रतिज्ञापत्र लिहून ~~देतो/~~ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला स्मार्ट शब्दांजली

हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेंच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

Shingare

स्पर्धकाची स्वाक्षरी

दिनांक : १८/११/२०२२

स्थळ : कोल्हापूर

नाव : सौ. माधवी मुकुंद शिनगारे

~~शाळेचा/कार्यालयाचा~~ शिक्का.

प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, ~~श्री~~/श्रीम/~~डॉ~~ सौ माधवी मुकुंद शिनगारे हे माझ्या शाळेत / ~~कार्यालयात~~ कार्यरत असून त्यांनी सादर केलेला स्मार्ट शब्दांजली

हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२ मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : १८/११/२०२२

स्थळ : कोल्हापूर

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव : श्रीम. विद्या प्रवीण यादव

शिक्का: मुख्याध्यापिका
प्रिन्स शिवाजी विद्यालय,
राजारामपुरी, कोल्हापूर.

**नवोपक्रमाची गरज व महत्त्व**

मराठी भाषा विषय हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे या विषयावरच इतर सर्व विषय अवलंबून आहेत, कारण विद्यार्थ्यांना मराठी लेखन वाचन समजपूर्वक आल्याशिवाय इतर विषयांचे आकलन होणार नाही. त्यासाठी मराठीचे वाचन लेखन गतीने व समज पूर्वक होणे आवश्यक आहे तसेच वाचन व लेखन स्वयंप्रेरणेने करणे आवश्यक आहे. सध्याच्या भारत सरकारच्या **FLN** व **NIPUN** भारत योजनेनुसार इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हे किती आवश्यक आहे, हे आपण जाणून आहोतच. यासाठी हा एक मी आगळावेगळा स्मार्ट शब्दांजली उपक्रम आयोजित करायचे ठरवले.

माझी शाळा ताराराणी विद्यापीठाचे प्रिन्स शिवाजी विद्यालय राजारामपुरी कोल्हापूर आहे या शाळेमध्ये मी इयत्ता दुसरीच्या वर्गावर सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहे. कोरोना महामारीमुळे माझ्या वर्गातील या विद्यार्थिनींची अंगणवाडी बालवाडी झालीच नाही. इयत्ता पहिली मध्ये कोरोना महामारीमुळे शाळा बंद होत्या तरीही आम्ही ऑनलाईन शिक्षण सुरूच ठेवले होते गुगल मीट द्वारे ऑनलाइन शिक्षण सुरू ठेवले पण यातील काही मुलींच्या घरी अँड्रॉइड मोबाईल फोन नसल्यामुळे या मुली जॉईन होऊ शकत नव्हत्या.. तरीही त्यांच्या पालकांना फोन करून शाळेमध्ये बोलून मुलींचा घरी अभ्यास कसा करून घ्यायचा याविषयी मार्गदर्शन केले होते. या मुली गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यामध्ये प्रत्यक्ष शाळेमध्ये दाखल झाल्या. तिथून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी खूप वेळ गेला. यामुळे या विद्यार्थ्यांना भाषिक गोडी लागण्यासाठी व शब्दसंपदा वाढविण्यासाठी **स्मार्ट शब्दांजली** मी हा नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित केलेला आहे.

**विश्व सारे शब्दरूपी**

**शब्दातच दडले विश्व सारे**

**शब्द शब्दच मिळूनी**

**विचारांचे वाहे वारे**

**महत्व -**

**FLN** अंतर्गत शब्दसंग्रह वाढविणे या निष्पत्तीसाठी हा उपक्रम खूप उपयुक्त आहे तसेच **NIPUN** अभियानांतर्गत इयत्ता दुसरी साठी असलेले वाचन व लेखन यासाठी असलेली उद्दिष्टे ही साध्य होण्यास मदत होईल.उदा. अक्षरांची जुळवा जुळवा करून शब्द तयार करणे. स्वतःला व्यक्त करण्यासाठी सोपी वाक्य लिहिता येणे.

स्मार्ट शब्दांजली ह्या उपक्रमातून दिलेल्या अक्षरांपासून शब्द तयार करणे, शब्दांचे वाचन करणे, त्या शब्दाशी संबंधित असणारे इतर दहा शब्दशोधणे, त्या वस्तूचे चित्र काढणे, त्याच शब्दांना अनुसरून वाक्यांचे लेखन करणे, उपयोग लिहिणे ,त्या शब्दांचे एक वचन - अनेक वचन शोधणे, समानार्थी शब्द शोधणे, लिंग शोधणे अशा प्रकारचे लेखन विद्यार्थिनींनी एका शब्दावरून करायचे आहे एका शब्दावरून मुलींना खूप विचार करून लिहावे लागणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी वाढण्यास मदत होईल.

प्रत्येक शब्दासाठी केलेले उपक्रम व्हिडिओद्वारे व भित्तिपत्रकाद्वारे प्रकाशित केले त्यामुळे ते उपक्रम सर्वांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

**नवोपक्रमाची उद्दिष्टे**

**१) विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित करणे.**
**२) विद्यार्थ्यांचा भाषा विषयाचा शब्दसंग्रह वाढविणे.**
**३) शब्दसंग्रह वाढवून माहिती लेखनास प्रोत्साहन देणे.**
**४) प्रत्येक शब्दाकडे पाहण्याचा चिकित्सक दृष्टिकोन निर्माण करणे.**

**४)नवोपक्रमाचे नियोजन**

**i) उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इयत्ता दुसरी मध्ये या विद्यार्थिनींनी प्रवेश घेतल्यानंतर असे लक्षात आले की विद्यार्थ्यांचे वाचन व लेखन यामध्ये अभाव जाणवत होता. कोरोना काळामध्ये शाळा बंद असल्यामुळे या विद्यार्थिनी बालवाडी मध्ये प्रत्यक्ष शाळेला आल्याच नव्हत्या तसेच इयत्ता पहिली मध्ये ही त्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले होते त्यामुळे इयत्ता दुसरी मध्ये शिक्षणाला सुरुवात कशी करायची हाच मोठा प्रश्न होता. काही काही विद्यार्थिनींची मुळाक्षरांपासून सुरुवात करण्यात आली. विद्यार्थिनी वाचनामध्ये अडखळत होत्या तसेच लेखन करतानाही बऱ्याच अडचणी जाणवत होत्या आणखी एक महत्त्वाची अडचण म्हणजे मुलींना विचार करता येत नव्हता. कारण त्या दोन वर्षात शाळेला गेल्या नसल्यामुळे परिसरातील वस्तूंची ओळख झाली नव्हती. कोरोना महामारी मुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा विकास झाला नव्हता. यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रमाची गरज होती नाविन्यपूर्ण व कृतीयुक्त शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना कृतिशील करणारा उपक्रम घेणे गरजेचे होते. यासाठी मुलांना जवळचे वाटणारे शब्द तसेच मुलांनी ज्या वस्तू पाहिल्या आहेत, अशाच वस्तूंची नावे लिहिता यावी, त्या वस्तूंची माहिती सांगता यावी, यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमाची गरज भासली . यातूनच विद्यार्थ्यांचे वैचारिक भावविश्व वृंदावन जावे अशी अपेक्षा होती .या सर्व मुलींना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी व त्यांचे भाषिक कौशल्य विकसित खूप गरजेचे वाटत होते.

**ii) संबंधित व्यक्तींशी तज्ञांशी चर्चा**

आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विद्या प्रवीण यादव मॅडम यांच्या मार्गदर्शनासनुसार मी हा स्मार्ट शब्दांजली हा उपक्रम वर्गामध्ये ऑगस्ट महिन्यापासून राबविण्यास सुरुवात केली . माझ्या सर्व सहकारी शिक्षक का यांच्या वैचारिक बैठकीतून ही मला या नवीन उपक्रमाची प्रेरणा मिळाली केंद्रस्तरावर अनेक शिक्षण परिषदा होत होत्या यातून तज्ञ मार्गदर्शकांचेही नवकमाबद्दल मार्गदर्शन मिळाले तसेच निपुण भारत अभियान या अंतर्गत प्राथमिक स्तरावर कोणकोणती

उद्दिष्टे साध्य करायची आहेत  याचीही  आम्हाला सविस्तर माहिती मिळाली . सदर उपक्रमाची कल्पना मी माझ्या महिन्याच्या पालक सभेमध्ये मांडली पालकांनी या उपक्रमास सकारात्मक पाठिंबा दिला. तसेच  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कोल्हापूर येथे नवोपक्रमाचे  प्रशिक्षण  मिळाले तसेच डायटचे प्राचार्य माननीय आय. सी. शेख साहेब तसेच माननीय प्रा. कुदळे मॅडम यांचेही वैयक्तिक मार्गदर्शन मिळाले . त्यामुळे आम्हाला हा उपक्रम सविस्तरपणे  आपल्यासमोर सादर करता आला .

### iii) आवश्यक साधनांचा विचार

नवकृमांतर्गत राबविण्यात येणारे कृती उपक्रम पूर्ण करण्यासाठी विविध साधनांची आवश्यकता होती सदरचा उपक्रम हा वर्गामध्येच विद्यार्थ्यांच्या मदतीने राबविला आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या समजतीने तयार केलेले साहित्य वापरण्यात आले आहे .यामुळे विद्यार्थ्यांनाही नवनिर्मितीचा आनंद येथे मिळणार आहे. स्मार्ट शब्दांजली  या उपक्रमासाठी  लागणारे  साहित्यही सहज उपलब्ध होणारे असेच आहे ते साहित्य खालील प्रमाणे -

I. अक्षर कार्डे,
II. शब्द कार्डे
III. रंगीबेरंगी कुंड्या,
IV. काड्या
V. चित्र तक्ते,
VI. शब्दांवर आधारित वस्तू,
VII. स्वयंअध्ययन पाट्या , व्हाईट बोर्ड मार्कर
VIII. व्हिडिओ दाखविण्यासाठी मोबाईल किंवा प्रोजेक्टर.
IX. विविध खेळ खेळण्यासाठी मोकळे मैदान

### iv) करावयाच्या कृतींचा क्रम

कृती क्रमांक १- **व्हिडिओ पाहणे व त्याविषयी गटामध्ये चर्चा करणे.**

**अध्ययन निष्पत्ती- पाहिलेल्या ऐकलेल्या गोष्टी कथा इत्यादीं बद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपले मत व्यक्त करतात.**

कृती क्रमांक २- **अक्षरांपासून शब्द तयार करणे.**

**अध्ययन निष्पत्ती - आकलन शक्तीनुसार शब्द तयार करतात.**

**कृती क्रमांक ३- तयार झालेला शब्द वाचणे.**

**अध्ययन निष्पत्ती - ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वतःच्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे शब्दांच्या स्वरूपात अभिव्यक्त करतात.**

**कृती क्रमांक ४- शब्दाविषयी चे चित्र काढणे.**

**अध्ययन निष्पत्ती- पाहिलेल्या गोष्टींचे स्वतःच्या कल्पनेने चित्र रेखाटतात.**

**कृती क्रमांक ५- शब्दाशी संबंधित इतर दहा शब्द शोधणे.**

**अध्ययन निष्पत्ती- शब्दाशी संबंधित असणारे दहा शब्द शोधून त्याचे लेखन करणे.**

**कृती क्रमांक ६- शब्दाविषयी माहिती लेखन करणे.**

**अध्ययन निष्पत्ती- आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभवांना आपल्या लेखनात समाविष्ट करतात.**

**कृती क्रमांक ७- शब्दाविषयी उपयोग लिहिणे.**

**अध्ययन निष्पत्ती – चिकित्सकपणे विचार करू लागतात.**

**कृती क्रमांक ८- शब्दाचे समानार्थी शब्द शोधणे. शब्दाचे एक वचन - अनेक वचन लिहिणे. दिलेल्या शब्दांची विशेष नावे शोधणे.**

**दिलेल्या शब्दाविषयी समानार्थी शब्द शोधणे किंवा जाणून घेण्याचा प्रयत्न करणे.**

**कृती क्रमांक ९-शैक्षणिक साहित्य तयार करणे .शब्दांची उडी शब्दांचा रिले शब्दांची राणी असे विविध खेळ खेळणे .**

**कृती क्रमांक १०-वस्तूचे आत्मकथन सादर करणे.**

**स्पष्टीकरण**

१) आज जो शब्द घेणार आहे त्याविषयीचा प्रथम प्रोजेक्टर द्वारे व्हिडिओ दाखविणे. किंवा पालकांच्या मोबाईलवर व्हाट्सअप द्वारे व्हिडिओ पाठविणे. त्या व्हिडिओचे विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक निरीक्षण करणे.

२) प्रत्यक्ष वस्तू दाखविणे. ज्या विद्यार्थ्यांना शक्य आहे अशा विद्यार्थ्यांना अगोदरच्या दिवशी या वस्तू शाळेमध्ये आणण्यास सांगणे. (उदा.फुले)

३) पाहिलेल्या व्हिडिओ विषयी  विद्यार्थ्यांनी स्वतःचे विचार व्यक्त करणे किंवा गटागटांमध्ये चर्चा करणे.

४) अक्षर कार्ड दाखवून ती अक्षर कार्डे जुळवून घेऊन अर्थपूर्ण शब्द तयार करणे.

५) तयार झालेल्या शब्दाचे वाचन करणे.

६) त्या शब्दाच्या वस्तूचा/ गोष्टीचा विचार करून चित्र काढणे.

७) त्या शब्दाविषयी विचार करून त्याच शब्दाशी संबंधित दहा शब्द शोधणे.

८) शोधलेल्या दहा शब्दांचे मुळाक्षरानुसार क्रम लावणे.

९) त्या शब्दावरून माहिती लिहिणे.

१०)त्याचे उपयोग लिहिणे.

११)त्या शब्दावर आधारित कविता किंवा गाणी शोधणे.

१२)त्या शब्दाचे समानार्थी शब्द शोधणे. एक वचन अनेक वचन शोधणे. लिंग शोधणे.

१३)सदर शब्दाला यमक जुळणारे शब्द शोधणे.

१४) उदा. फूल शब्द असल्यास फुलांची नावे लिहिता येणे.

१५)स्वयं अध्ययन पार्टीचा वापर करून त्यावर दिलेल्या चित्राविषयी माहिती लिहिणे.

१६)शब्द उडीचा खेळ खेळणे.

१७)शब्दांचा रिले खेळ खेळणे.

१८)शब्दांची राणी हा खेळ खेळणे.

१९)गाणी ऐकू व शब्द लिहू या खेळामध्ये गाणे ऐकायचे व लक्षात राहिलेले शब्द लिहायचे.

२०)विद्यार्थिनी केलेल्या कृतींचा व्हिडिओ बनवून युट्युब वर अपलोड करणे.

२१) विद्यार्थिनी  केलेल्या उपक्रमाचे  पीडीएफ बनवणे . त्या पीडीएफ ला किंवा कोड देऊन शाळेच्या भितीपत्रकामध्ये लावणे.

२२) ज्या विद्यार्थिनी या उपक्रमामध्ये थोड्या मागे राहतील त्या विद्यार्थ्यांसाठी वाक्यांजली गटातील विद्यार्थ्यांनी जोडून देऊन त्यांचा पुन्हा पुन्हा सराव घेणे.

**v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण**

**उपक्रम तर चाचणी द्वारे आलेल्या निष्कर्षातून विद्यार्थ्यांमधील पुढील बदल दिसून आला.**

१) नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला.

२) प्रत्यक्ष कृती करायला मिळाल्यामुळे आनंद मिळाला.

३) निवडलेल्या शब्दाची माहिती व्हिडिओद्वारे पाहिल्यामुळे मुलांच्या या वस्तू विषयी विचारांमध्ये भर पडली.

४) विद्यार्थ्यांनी ही वस्तू प्रत्यक्ष पाहिल्यामुळे ही कायमस्वरूपी लक्षात राहिली.

५) या वस्तूच्या शब्दाचे वाचन  करता आले.

६) दिलेल्या शब्दाशी संबंधित शब्दांचा विचार करून त्याचे लेखनही करता आले.

७) दिलेल्या  शब्दाविषयी  विचार करून माहिती सांगता व लिहिता आली .

८) ज्या विद्यार्थिनी लेखनामध्ये थोड्या मागे आहेत त्यांनी ती माहिती सांगण्याचा छान प्रयत्न केला.

९) त्या शब्दाचे समानार्थी शब्द विद्यार्थ्यांनी शोधण्याचा प्रयत्न केला.

१०) त्या शब्दाचे एक वचन अनेक वचन शोधले.

११) विद्यार्थ्यांमध्ये निवडलेल्या शब्दांविषयी विचार करण्याची चिकित्सक वृत्ती निर्माण झाली.

१२) त्यामुळे त्या प्रत्येक शब्दांकडे बारकाईने पाहू लागल्या.

१३) या उपक्रमामध्ये ज्या विद्यार्थिनी काही कारणास्तव मागे राहत होत्या अशा विद्यार्थिनींच्या जोडीला म्हणजेच अक्षरांजली मधील विद्यार्थिनींना वाक्यांजली या गटातील विद्यार्थिनी जोडून देऊन व

विद्यार्थिनींनी तयार केलेले शैक्षणिक साहित्याचा वापर करून त्यांचा रिकामा वेळेत सराव घेण्यास सांगितला गेला.

१४) यामुळे अक्षरांजली गटातील विद्यार्थिनी शब्दांजली गटामध्ये जाण्यास मदत झाली.

**vi)कार्यवाहीचे टप्पे**

जागतिक महामारीमुळे आलेल्या संकटातून जिद्दीने बाहेर पडणे व तेवढ्याच ताकतीने यशस्वी होण्यासाठी माझा हा स्मार्ट शब्दांजली उपक्रम खूपच उपयुक्त ठरला आहे यासाठी मी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता दुसरीच्या वर्गावर सदर उपक्रम राबविला आहे यासाठी खालील प्रमाणे नियोजन करण्यात आली होते.

पूर्व चाचणीनुसार सदर विद्यार्थ्यांचे तीन गट करण्यात आले.

१) अक्षरांजली ( अक्षर गट)

२) शब्दांजली ( शब्द गट)

३) वाक्यांजली ( वाक्य गट)

१) **अक्षरांजली** (अक्षर गट)

या गटामधील विद्यार्थिनी या काही कारणास्तव मुळाक्षरांच्या वाचनामध्येच आहेत. या विद्यार्थिनींचे अध्ययन करण्याची गती थोडी कमी जाणवते त्यामुळे या विद्यार्थिनींच्या गतीनुसार त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. हा उपक्रम राबवत असताना दाखवलेल्या वस्तूंविषयी या गटातील विद्यार्थिनी तोंडी उत्तरे सहजपणे देतात पण लिहिताना काही शुद्ध लेखनाच्या चुका होतात. यासाठी त्यांना प्रत्यक्ष चित्र वस्तू व ते शब्द दाखवणे आवश्यक ठरते. ज्या दिवशी जो शब्द ठरविला आहे त्याविषयीची वस्तू चित्र सर्वच मुलींना दाखवले जाते व त्यातील अक्षरांची फोड करून या अक्षरांची घटातील विद्यार्थिनींना शब्द तयार करण्यास सांगितले जाते तसेच तो शब्द पुन्हा पुन्हा लिहिण्यास सांगितले जाते त्यामुळे या गटातील विद्यार्थिनींना तो शब्द

कायमस्वरूपी स्मरणात राहतो. त्या शब्दाविषयी त्या धीटपणे बोलू शकतात शब्दाविषयी धीटपणे बोलू शकतात. हा आत्मविश्वास विद्यार्थिनींच्या मध्ये आल्यानंतर आपल्याला काहीतरी येते हे स्वतःला समजणे खूप मोठी आहे. यामुळे विद्यार्थी शब्द लेखनाकडे स्वयंप्रेरणेने वळतात. सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होतात सर्व शाब्दिक खेळ आवडीने खेळतात.

अक्षर गटामध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांनी

२) अलिझा जमीर कोतवाल
३) आलिया जमीर कोतवाल
४) सौरवी स्वप्नील नानवडे
५) क्षितिजा लॉरेन्स कवाळे
६) आरुषी राजेश पवार
७) सफा इमरान शिकलगार
८) सिद्धीका खालिक बागवान
९) शर्वरी यशवंत चव्हाण
१०) केतकी संतोष दळवी

**शब्दांजली ( शब्द गट)**

या गटातील विद्यार्थिनी संपूर्ण बाराखडी चे वाचन करून सर्व शब्द अचूकपणे वाचतात पण यातील विद्यार्थिनींना अर्थपूर्ण वाक्य तयार करता येत नाही. वस्तूंविषयी पटकन वाक्य सुचत नाहीत. त्यामुळे हा उपक्रम या विद्यार्थिनींसाठी खूप महत्त्वाचा आहे कारण या शब्दांजली उपक्रमामुळे या विद्यार्थिनींच्या लेखनामध्ये खूप प्रगती होणार आहे.

**शब्दगटामध्ये असणाऱ्या विद्यार्थिनी**

| |
|---|
| 1. आदिती उमेश मराठे |
| 2. आलिया अशपाक नगारजी |
| 3. आराध्या आकाश शिंदे |
| 4. आराध्या प्रदीप पोवार |
| 5. आरोही रोहित मोरे |
| 6. आर्या संतोष मेखले |
| 7. अनुष्का सचिन जामदार |
| 8. अस्मिता संतोष कांबळे |
| 9. दिप्ती मिलिंद दांगट |
| 10. दिशा संदीप पाटील |
| 12. ग्रेसी नितीन कवाळे |
| 13. गौरी संदीप कांबळे |
| 14. जानवी रणजीत चव्हाण |
| 15. कादंबरी संतोष चौगुले |
| 16. लक्षिता बुधाराम चौधरी |
| 17. माहिरा मेहबुब शेख |
| 18. मनस्वी महेश माने |
| 19. प्रांजल प्रकाश रेणके |
| 20. सई विनायक चौगुले |
| 21. समृद्धी संदीप पाटील |
| 22. श्रेया महादेव बाराते |
| 23 स्वानंदी उदय भोसले |
| 24. स्वरा रविंद्र कांबळे |
| 25. स्वरा जयदीप रसाळ |
| 26. स्वरा उमेश दोडमणी |

| | |
|---|---|
| 27. **शर्वरी महादेव कुऱ्हाडे** |
| 28. **तनिष्का निलेश संकपाळ** |
| 29. **विन्मयी घुळाप्पा केंपवाडे** |
| 30. **वैभवी अरुण तांबे** |
| 31. **आराध्या बाळासाहेब भोसले** |

## वाक्यांजली

वाक्य गटामध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांना

१) आराध्या महादेव पवार
२) आर्या गुरुप्रसाद बसणकर
३) इंद्रायणी रणजीत भोसले
४) दूर्वा प्रमोद दळवी
५) ईश्वरी उत्तम मोरे
६) मनस्वी रोहित कांबळे
७) सानवी अभिजीत खोत
८) स्वप्नाली शहाजी लवटे
९) साक्षी लक्ष्मण भातकांडे
१०) स्वरांजली शशिकांत सावंत
११) स्वराली रवींद्र दाभाडे
१२) स्वराली विनोद सुतार
१३) रिद्धी निलेश पाटील

| अ.नं. | शब्द | दिनांक |
|---|---|---|
| १ | गणपती | २२/८/२०२२ |
| २ | झाडे | २९/८/२०२२ |
| ३ | मोबाईल | ६/९/२०२२ |
| ४ | घर | १२/२०२२ |
| ५ | फुले | १९/९/२०२२ |
| ६ | फळे | २७/९/२०२२ |
| ७ | आई | ३/१०/२०२२ |
| ८ | बाबा | ५/१०/२०२२ |
| ९ | खेळणी | १०/१०/२०२२ |
| १० | शाळा | १७/१०/२०२२ |

**vii ) उपक्रमासाठी इतरांची मदत**

स्मार्ट शब्दांजली हा उपक्रम राबविण्यासाठी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विद्या प्रवीण यादव मॅडम यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तसेच माझ्या सर्व सहकारी शिक्षिका यांच्या विचारविनिमयातूनही मला नवनवीन कल्पना सुचत गेल्या. माझ्या विद्यार्थिनींच्या पालकांनीही विद्यार्थिनींना विविध साहित्य पुरवून या उपक्रमामध्ये अनमोल सहकार्य केले. माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांचे पालक ही सुशिक्षित असल्यामुळे त्यांनीही मुलींना या उपक्रमांमध्ये खूप सहकार्य केले. तसेच या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक ही केले.

**Viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे**

**सदर नवोपक्रमाचे व्हिडिओ युट्युब वर प्रसारित केला आहे. त्याची लिंक खाली दिलेली आहे.**

**स्मार्ट शब्दांजली संपूर्ण नवोपक्रम**

https://youtu.be/Y-CCr3e-neQ

**शब्दांची उडी**

https://youtu.be/sNVOAawimF0

**शब्दांचा रिले**

https://youtu.be/DNYwR43gzQg

**स्मार्ट शब्दांजली -खेळणी**

https://youtu.be/fszmUKZR9CI




माझी स्वयंअध्ययन पाटी


सदर नवोपक्रमाचे विद्यार्थिनींच्या कृतीचे निवडक फोटो खालील प्रमाणे









झाड

झाड
झाड हिरवे गार असते.
झाड फळे, फुले देते.
झाडाला खूप पाने असतात.
झाड मला खूप आवडते.




सूर्य
सूर्य प्रकाश देतो.
सूर्य पूर्वेकडे उगवतो.
सूर्य पिवळा असतो.
सूर्य गोल असतो.
सूर्य आपल्याला उष्णता देतो.


भिकारी
मिरची
भरपूर


भिकारी
भरपूर
कबूतर


अक्षरांचा हात
I am potter.
I use a wheel.


वाक्यांजली
शब्दांजली
अक्षरांजली
वर
सुंदर
घरात
आहे
वाचू
चौदाखडी
स्वयंअध्ययन कार्डे
स्वयंअध्ययन पाट्या


शब्दांची गाडी
फुगे
मोठे
हवा
रंगीत
वाढदिवस


शब्दांचे चक्र




शैक्षणिक साहित्य
वाक्यांजली
शब्दांजली
आषाढ
अक्षरांजली




राम
खातो
वाक्यरचना


चला वाक्ये बनवूया
राम
आंबा
खातो.
वाक्यरचना


शब्दांची राणी

शब्दांची राणी

शब्दांची राणी


शब्दांची राणी
शब्दांची राणी

शब्दांची राणी
शब्दांची राणी




स्मार्ट शब्दांजली हस्तलिखित
प्रकाशन
स्मार्ट शब्दांजली
Drop the stone.
Pick it up.
Pick up the bag.
Put it down.
स्मार्ट शब्दांजली हस्तलिखित
प्रकाशन

**५) नवोपक्रमाची कार्यपद्धती**

**I) पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

उपक्रम राबवण्यात अगोदर विद्यार्थीनी पहिली तून दुसरी मध्ये आल्यानंतर सेतू अभ्यास पूर्व चाचणी घेतली व मार्गदर्शन करून उत्तर चाचणी घेतली. तरीही काही विद्यार्थिनी मागे राहिलेल्या दिसून आल्या. या सर्वच मुलींसाठी सदर उपक्रम राबविण्याचे ठरविले यासाठी पूर्व चाचणी घेतली. यानुसार खाली बाबी निदर्शनास आल्या.

- विद्यार्थिनींमध्ये विचार करण्याची  क्षमतेचा अभाव जाणवला
- विद्यार्थ्यांमध्ये भाषा विषयाची गोडी कमी जाणवली.
- विद्यार्थिनींमध्ये शब्द संग्रह कमी आहे असे जाणवले.
- विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्जासाचा अभाव जाणवला.
- काही विद्यार्थिनींच्या घरगुती अडचणींमुळे पहिली मध्ये जास्त दिवस शाळेला येऊ शकल्या नाहीत अशा विद्यार्थ्यांनी अजून मुळाक्षरांच्या वाचनामध्येच होत्या.
- काही विद्यार्थिनी शब्द वाचन करत होत्या पण आकलनात्मक वाचन होत नव्हते.
- शब्द वाचन गतीने करता येत नव्हते.
- काही विद्यार्थिनी शब्द अचूक वाचत होत्या पण त्यांना वाक्यरचना करता येत नव्हती.
- वाचन व लेखन गतीने करता येत नव्हते

अशाप्रकारे पूर्व चाचणीवरून विद्यार्थ्यांमध्ये बऱ्याच उणिवा दिसून आल्या.

**II) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन**

**इयत्ता दुसरी मधील या उपक्रमामध्ये ४५ विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला.**

**या निवडलेल्या सर्व विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेऊन निरीक्षणे नोंदविण्यात आली या उपक्रमाची पालकांनाही कल्पना देण्यात आली. या उपक्रमासाठी विद्यार्थिनींना शंभर पानी वही घालण्यास सांगण्यात आले. कोण कोणते शब्द केव्हा घ्यायचे याचे नियोजन करण्यात आले. याची सर्व माहिती**

विद्यार्थिनी नाही देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांनी अगदी उत्साहाने उपक्रमामध्ये सहभागी झाल्या.

सदर उपक्रमामध्ये खालील कृतींचा समावेश करण्यात आला.

कृती क्रमांक १- व्हिडिओ पाहणे व त्याविषयी गटामध्ये चर्चा करणे.
अध्ययन निष्पत्ती- पाहिलेल्या ऐकलेल्या गोष्टी कथा इत्यादीं बद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपले मत व्यक्त करतात.
उद्या कोणता शब्द वर्गामध्ये घ्यायचा आहे त्याविषयीचा व्हिडिओ वर्गाच्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठवला जायचा व तो विद्यार्थ्यांना आवर्जून लक्षपूर्वक पाहण्याची सूचना दिली जायची. पाहिलेल्या व्हिडिओ विषयी वर्गातील गटांमध्ये चर्चा करणे.

कृती क्रमांक २- अक्षरांपासून शब्द तयार करणे.
अध्ययन निष्पत्ती - आकलन शक्तीनुसार शब्द तयार करतात.
जो शब्द तयार होणार आहे त्यातील अक्षरे विस्कटलेली ठेवून त्यापासून विद्यार्थ्यांनी अर्थपूर्ण शब्द तयार करणे.

कृती क्रमांक ३- तयार झालेला शब्द वाचणे.
अध्ययन निष्पत्ती - ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वतःच्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे शब्दांच्या स्वरूपात अभिव्यक्त करतात.
अर्थपूर्ण शब्दांचे मोठ्याने वाचन करणे.

कृती क्रमांक ४- शब्दाविषयी चे चित्र काढणे.
अध्ययन निष्पत्ती- पाहिलेल्या गोष्टींचे स्वतःच्या कल्पनेने चित्र रेखाटतात.
चित्र काढून रंगविणे हा विद्यार्थ्यांच्या जवळचा व आवडीचा विषय आहे. या कृती मधून विद्यार्थी त्या शब्दांच्या व वस्तूच्या जवळ जाऊन पोहोचतो. तसेच त्याला अध्ययनामध्ये गोडी निर्माण होते.

**कृती क्रमांक ५- शब्दाशी संबंधित इतर दहा शब्द शोधणे.**

**अध्ययन निष्पत्ती-**

**शब्दाशी संबंधित असणारे दहा शब्द शोधून त्याचे लेखन करणे.**

**उदा. फुल शब्द दिला असेल तर त्याच्याशी संबंधित वेल ,सुगंध, कळी ,सुंदर, रंगीबेरंगी अशा प्रकारचे शब्द शोधता येतील.**

**कृती क्रमांक ६- शब्दाविषयी माहिती लेखन करणे.**

**अध्ययन निष्पत्ती- आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभवांना आपल्या लेखनात समाविष्ट करतात.**

**दिलेल्या शब्दाविषयी स्वतःचे विचार सांगता येणे तसेच लिहिता येणे.**

**कृती क्रमांक ७- शब्दाविषयी उपयोग लिहिणे .**

**अध्ययन निष्पत्ती - चिकित्सकपणे विचार करू लागतात.**

**शब्दाविषयी विचार करून ती प्रत्यक्ष वस्तू आठवण त्याचे उपयोग लिहिणे व सांगणे.**

**कृती क्रमांक ८- शब्दाचे समानार्थी शब्द शोधणे.**

**दिलेल्या शब्दाविषयी समानार्थी शब्द शोधणे किंवा जाणून घेण्याचा प्रयत्न करणे.**

**कृती क्रमांक ९- शब्दाचे एक वचन - अनेक वचन लिहिणे.**

**शब्दाच्या वस्तूचा विचार करून एक वस्तू असल्यास काय म्हटले जाते तसेच अनेक वस्तू असल्यास काय म्हटले जाते याचा विचार करून लेखन करणे.**

**कृती क्रमांक १०- दिलेल्या शब्दांची विशेष नावे शोधणे.**

**उदा. फुले हा शब्द दिला असल्यास यामध्ये फुलांची विविध नावे शोधून लिहिणे.**

शब्द वाचनाच्या व लेखनाच्या दृढीकरणासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

१) शब्द उडी
२) शब्द रिले
३) शब्दांची राणी

१) शब्द उडी

या खेळामध्ये ठराविक अंतरावर विविध शब्द ठेवण्यात आले होते अशा शब्दांच्या तीन रांगा करण्यात आल्या होत्या. या तीन रांगांसाठी तीन विद्यार्थिनी स्पर्धात म्हणून सहभागी होतील व स्पर्धा सुरू झाल्यावर विद्यार्थिनींनी शब्द वाचत वाचत उड्या मारत पुढे जायचे आहे त्या ओळीतील पटकन सर्व शब्द वाचून अंतिम रेषेपर्यंत प्रथम जी विद्यार्थिनी पोहोचेल ती या खेळाची विजेती ठरेल.

अशाप्रकारे हा खेळ घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मध्ये एक प्रकारचे चुरस निर्माण झाली व विद्यार्थ्यांच्या मध्ये शब्द वाचनाचा वेग वाढला.

२) शब्दांचा रिले


शब्दांचा रिले हा खेळ गतीने लेखन करण्यासाठी उपयोगी आहे. या खेळामध्ये विद्यार्थिनी जोडी जोडीने सहभागी होतात. यामध्ये सर्व गटांना एकच अक्षर दिले जाते त्या अक्षराने सुरू होणारा एक शब्द पहिल्या विद्यार्थिनींनी लिहून आपल्या गटातील मैत्रिणीला कागद देणे शेवटच्या अक्षरावरून दुसऱ्या मैत्रिणीने शब्द लिहिणे व तो तिसऱ्या विद्यार्थिनीकडे पास करणे. असे करत असताना प्रथम कोणत्या गटाचे लेखन पूर्ण होईल तो गट या स्पर्धेमध्ये विजेता ठरेल.

३) शब्दांची राणी

या खेळामुळे विद्यार्थिनींचे शब्द वाचन व लेखन गतीने होण्यास मदत होईल.

यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना एक एक शब्दांची टोपली दिली जाईल त्या टोपलीतील शब्द पटकन वाचन करायचे व त्या शब्दाला यमक जुळणारे शब्द


स्वयंअध्ययन पाटीवर लिहायचे. असे असे करत करत ज्या विद्यार्थिनींची शब्दांची टोपली पूर्ण होईल त्या विद्यार्थिनी शब्दांची राणी या किताबाने गौरवण्यात येईल.



## शब्दांची राणी

वरील प्रमाणे शब्दांच्या राणीला मुकुट व शब्दांच्या राणी या नावाने गौरवण्यात येईल.

वरील उपक्रम हे प्रत्येक आठवड्याला खेळले जातील. यातून विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाची आवड निर्माण होईल. शब्दसंग्रह वाढविण्यास विद्यार्थी स्वतःहून उत्सुक राहतील.




फुले
झाड
सुगंध

सुगंध


शब्दांची राणी

**III) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

- **विद्यार्थिनींमध्ये विविध उपक्रम घेतल्यामुळे नवनवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता निर्माण झाली.**
- **सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेऊ लागल्या.**
- **प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सकृतीने पाहण्याची दृष्टी निर्माण झाली.**
- **आजूबाजूच्या परिसरा विषयी ज्ञान मिळवण्याची उत्सुकता निर्माण झाली.**
- **शाळेविषयी गोडी वाटू लागली.**
- **वाचन व लेखन क्षमता विकसित होण्यास मदत झाली.**
- **वाचन व लेखन क्षमता विकसित झाल्यामुळे आत्मविश्वास वाढीस लागला.**

**विद्यार्थिनी ही उत्साहाने उपक्रमामध्ये सहभागी होऊ लागल्या.**
**विद्यार्थिनींनी केलेल्या उपक्रमाचे फोटो व व्हिडिओचे संकलन करून ठेवले आहे.**

**IV) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी**

**सदर उपक्रम राबवित असताना प्रथम असे लक्षात आले की विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह कमी असल्यामुळे त्यांना पटकन त्या वस्तूंविषयी माहिती सांगता येत नव्हती. पण व्हिडिओ पाहून माहिती ऐकून इतर विद्यार्थिनींच्या बरोबर गटचर्चा करून विद्यार्थिनी माहिती मिळू लागल्या त्यामुळे त्या विद्यार्थिनी माहिती सांगण्याचा प्रयत्न करू लागल्या. नंतर हळूहळू लेखनामध्येही प्रगती दिसून येऊ लागली.**

**V) माहितीचे विश्लेषण: आलेख तक्ते**

ठराविक वेळेमध्ये दिलेल्या विषयावर जास्तीत जास्त किती वाक्य लिहू शकतात यावरून आलेख तयार करण्यात आलेला आहे प्रथम केलेली नोंदणी व अंतिम केलेली नोंदणी खालील प्रमाणे दर्शविली आहे.

| अ.नं. | विद्यार्थिनीचे नाव | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | १० | १० |
| १ | आदिती उमेश मराठे | ५ | ८ |
| २ | आलिया अशपाक नगारजी | ६ | ८ |
| ३ | आलिया जमीर कोतवाल | २ | ६ |
| ४ | आराध्या आकाश शिंदे | ५ | ७ |
| ५ | आराध्या महादेव पवार | ९ | ९ |
| ६ | आराध्या प्रदीप पोवार | ५ | ८ |
| ७ | आरोही अविनाश हजारे | ६ | ८ |
| ८ | आरोही रोहित मोरे | ७ | ९ |
| ९ | आर्या गुरुप्रसाद बसणकर | ८ | १० |
| १० | आर्या संतोष मेखले | ७ | ९ |
| ११ | अलिझा जमीर कोतवाल | २ | ५ |
| १२ | अनुष्का सचिन जामदार | ७ | ९ |
| १३ | अरुषी राजेश पवार | २ | ५ |
| १४ | अस्मिता संतोष कांबळे | ५ | ८ |
| १५ | दिप्ती मिलिंद दांगट | ७ | ९ |
| १६ | दिशा संदीप पाटील | ६ | ८ |
| १७ | दुर्वा प्रमोद दळवी | ९ | १० |
| १८ | इंद्रायणी रणजीत भोसले | १० | १० |
| १९ | ईश्वरी उत्तम मोरे | १० | १० |
| २० | ग्रेसी नितीन कवाळे | ७ | ९ |
| २१ | गौरी संदीप कांबळे | ७ | ९ |
| २२ | जान्हवी रणजीत चव्हाण | ५ | ८ |
| २३ | कादंबरी संतोष चौगुले | ७ | ९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | क्षितिजा लॉरेन्स कवाळे | २ | ५ |
| २५ | लक्षिता बुधाराम चौधरी | ६ | ८ |
| २६ | माहिरा मेहबुब शेख | ६ | ९ |
| २७ | मनस्वी महेश माने | ७ | ९ |
| २८ | मनस्वी रोहित कांबळे | १० | १० |
| २९ | प्रांजल प्रकाश रेणके | ७ | ९ |
| ३० | सई विनायक चौगुले | ७ | ९ |
| ३१ | सफा इम्रान शिकलगार | २ | ६ |
| ३२ | सानवी अभिजीत खोत | ९ | १० |
| ३३ | साक्षी लक्ष्मण भातकांडे | ९ | १० |
| ३४ | समृद्धी संदीप पाटील | ६ | ८ |
| ३५ | सिद्दिका खालिक बागवान | ३ | ६ |
| ३६ | श्रेया महादेव बाराते | ५ | ८ |
| ३७ | शर्वरी महादेव कुऱ्हाडे | ५ | ७ |
| ३८ | सौरवी स्वप्नील नलवडे | ३ | ६ |
| ३९ | स्वप्नाली शहाजी लवटे | ९ | १० |
| ४० | स्वानंदी उदय भोसले | ७ | १० |
| ४१ | स्वरा रविंद्र कांबळे | ९ | १० |
| ४२ | स्वरा जयदीप रसाळ | २ | ६ |
| ४३ | स्वरा उमेश दोडमणी | ५ | ८ |
| ४४ | स्वरांजली शशिकांत सावंत | ९ | १० |
| ४५ | स्वराली संदीप दाभाडे | ९ | १० |
| ४६ | स्वराली विनोद सुतार | ९ | १० |
| ४७ | तनिष्का निलेश संकपाळ | ७ | ९ |
| ४८ | विन्मयी घुळाप्पा केंपवाडे | ७ | ९ |
| ४९ | वैभवी अरुण तांबे | ७ | ९ |


| | | | |
|---|---|---|---|
| ५० | रिद्धी निलेश पाटील | ९ | १० |
| ५१ | शर्वरी यशवंत चव्हाण | १ | ५ |
| ५२ | आराध्या बाळासाहेब भोसले | ७ | ८ |
| ५३ | केतकी संतोष दळवी | २ | ७ |

वरील पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांनुसार खालील गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले.

**० ते ४ गुण -अक्षरांजली गट**

**५ ते ८ गुण -शब्दांजली गट**

**८ ते १० गुण वाक्यांजली गट**




**- पूर्व चाचणी** **- उत्तर चाचणी**

**शब्दांजली गटामध्ये असणाऱ्या विद्यार्थिनी**

११) अलिझा जमीर कोतवाल
१२) आलिया जमीर कोतवाल
१३) सौरवी स्वप्नील नलवडे
१४) क्षितिजा लॉरेन्स कवाळे
१५) आरुषी राजेश पवार
१६) सफा इमरान शिकलगार
१७) सिद्धीका खालिक बागवान
१८) शर्वरी यशवंत चव्हाण
१९) केतकी संतोष दळवी
२०) आरोही अविनाश हजारे
२१) शर्वरी महादेव कुऱ्हाडे
२२) स्वरा जयदीप रसाळ

**वाक्यांजली गटामध्ये असणाऱ्या विद्यार्थिनी**

1. आदिती उमेश मराठे
2. आलिया अशपाक नगारजी
3. आराध्या आकाश शिंदे
4. आराध्या प्रदीप पोवार
5. आरोही रोहित मोरे
6. आर्या संतोष मेखले

7. अनुष्का सचिन जामदार

8. अस्मिता संतोष कांबळे

9. दिप्ती मिलिंद दांगट

10. दिशा संदीप पाटील

12. ग्रेसी नितीन कवाळे

13. गौरी संदीप कांबळे

14. जानवी रणजीत चव्हाण

15. कादंबरी संतोष चौगुले

16. लक्षिता बुधाराम चौधरी

17. माहिरा मेहबुब शेख

18. मनस्वी महेश माने

19. प्रांजल प्रकाश रेणके

20. सई विनायक चौगुले

21. समृद्धी संदीप पाटील

22. श्रेया महादेव बाराते

23 स्वानंदी उदय भोसले

24. स्वरा रविंद्र कांबळे

25. स्वरा जयदीप रसाळ

26. स्वरा उमेश दोडमणी

27. स्वराली संदीप दाभाडे

28. तनिष्का निलेश संकपाळ

29. विन्मयी घुळाप्पा केंपवाडे

30. वैभवी अरुण तांबे

31. आराध्या बाळासाहेब भोसले

32..आराध्या महादेव पवार

33.आर्या गुरुप्रसाद  बसणकर

34.इंद्रायणी रणजीत भोसले

35.दूर्वा प्रमोद दळवी

36.ईश्वरी उत्तम मोरे

37.मनस्वी रोहित कांबळे

38.सानवी अभिजीत खोत

39.स्वप्नाली शहाजी लवटे

40.साक्षी लक्ष्मण भातकांडे

41. स्वरांजली शशिकांत सावंत

42. रिद्धी निलेश पाटील

**६) नवोपक्रमाची यशस्विता फलनिष्पत्ती**

स्मार्ट शब्दांजली हा उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासामध्ये खूपच प्रगती दिसून आली. विद्यार्थी फक्त वाचन व लेखनामध्येच विकसित झाले नाहीत तर त्यांच्या शाळेतील वर्तनावरही सकारात्मक परिणाम दिसून आला विद्यार्थिनी शाळेमध्ये नियमित येऊ लागल्या विद्यार्थिनींना अभ्यासाविषयी घोडी निर्माण झाली. विद्यार्थिनी वर्गामध्ये सभा धीरपणे बोलू लागल्या. आपले मत स्पष्टपणे व्यक्त करू लागल्या. तसेच स्मार्ट शब्दांजली हा नवोपक्रम सर्व पालकांपर्यंत ही पोहोचला. या यातील उपक्रमांचा व्हिडिओ युट्युब वर अपलोड केल्यामुळे राज्यातील सर्व शिक्षकांनाही स्मार्ट शब्दांजली हा उपक्रम पहावयास मिळाल्यामुळे सर्व उपक्रम शिक्षकांनाही हा उपक्रम मार्गदर्शक ठरेल.

**विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त**

१) विद्यार्थ्यांना स्मार्ट शब्दांजली या उपक्रमामुळे अध्ययनाची गोडी निर्माण झाली.

२)विद्यार्थ्यांना या उपक्रमामध्ये प्रत्यक्ष कृती कराव्यास मिळाली तसेच वेगवेगळ्या खेळांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली त्यामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळाले.

३) विद्यार्थ्यांनी व्हिडिओ पाहून त्यासंबंधी गटचर्चा करून ते सर्वांसमोर आपले विचार मांडले तसेच निवडलेल्या शब्दांसंबंधी शब्द सांगून वाक्यरचना केली तसेच माहितीचे लेखनही केले. या सर्व कृती त्यांनी स्वतः केल्यामुळे ज्ञानरचनावादी शिक्षण मिळाले.

४) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून सर्व विद्यार्थी एकमेकांशी मिळून मिसळून राहू लागले.

५) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास ही मदत झाली.

**पालकांसाठी उपयुक्त**

१) स्मार्ट शब्दांजली या नव उपक्रमामध्ये पालकांनीही मोलाचे सहकार्य केले. जो शब्द निवडला आहे त्या शब्दाची वस्तू शोधून विद्यार्थ्यांना देणे तसेच त्या वस्तू विषयी माहिती सांगणे त्याचा व्हिडिओ दाखविण्याचे कामही पालकांनी केले.

२) नवीन अभ्यासक्रम व नवीन अध्यापन पद्धतीनुसार वर्गामध्ये शिक्षण कसे चालते, याचा उत्तम नमुना पालकांच्या पर्यंत पोहोचण्यास मदत झाली. शाळेत

विविध उपक्रमांचे व्हिडिओ बनविल्यामुळे पालकांना प्रत्यक्ष शाळेमध्ये कृती कशी केली जाते हे समजले. त्यामुळे घरीही पालक त्याप्रमाणे आपल्या पाल्याला मार्गदर्शन करू लागले.

३) पालकांच्याही मनात शाळेबद्दल आदर निर्माण झाल्या.

**शिक्षकांसाठी उपयुक्त**

१) या नवोपक्रमामध्ये कार्यवाही करताना केलेल्या विद्यार्थ्यांचे गट तसेच कृतींचा क्रम यामुळे विद्यार्थी शब्द वाचनातून वाक्य वाचनाकडे सहजपणे जातात. यातील हा कृतींचा क्रम सर्व शिक्षकांनाही आपल्या अध्यापनास उपयुक्त ठरेल.

२) या उपक्रमामध्ये घेतलेले विविध खेळ हे आपण हिंदी, इंग्रजी, मराठी या सर्व विषयांसाठी घेऊ शकतो.

३) मोबाईलचाही वापर आपण स्मार्ट पद्धतीने कसा करू शकतो, हे या उपक्रमातून समजते.

या उपक्रमासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे पुढीलप्रमाणे प्राप्त झाली

i) विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित झाले.

ii) विद्यार्थ्यांच्या भाषा विकासाचा शब्दसंग्रह वाढला.

iii) शब्दसंग्रह वाढल्यामुळे माहिती लेखन करता येऊ लागले.

iv) प्रत्येक शब्दाकडे पाहण्याचा चिकित्सक दृष्टिकोन निर्माण झाला.

## ७) समारोप

या स्मार्ट शब्दांजली उपक्रमामुळे माझ्या वर्गातील विद्यार्थिनींना खूपच फायदा झालेला आहे. मुलींचा वैचारिक विकास होण्यास खूप मदत झाली आहे तसेच मूळ विद्यार्थिनींसाठी मलाही यातून काही नवीन कार्य करण्याची संधी मिळाली. अक्षर गटातील विद्यार्थिनी शब्द गटात जाताना व शब्द गटातील विद्यार्थिनी वाक्य गटात जाणारा जाताना विद्यार्थिनींना आनंद होतच होता त्याबरोबर मलाही अत्यानंद होत होता कारण आपल्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या मध्ये होणारी सुधारणा पाहून मला खूप धन्य वाटत होते.

कोरोना महामारीच्या काळामध्येदोन वर्ष शिक्षणामध्ये खूपचनुकसान झाले आहेहे नुकसान भरून काढणे सहजासहजी शक्य नाहीतरीही आपण सर्व शिक्षक कंबर कसूनआपल्या विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहाच्या मध्ये आणण्याचा खूप कसोशीने प्रयत्न करीत आहोत. यासाठीचFLN व NIPUN भारत योजना राबविल्या जात आहेत. शिक्षण प्रवाहातून बाजूला गेलेल्या विद्यार्थ्यांना प्रवाह मध्ये आणण्यासाठी मी हाती घेतलेला नवग्रह यशस्वी झाला असे मला वाटते.
स्मार्ट शब्दांजली हा उपक्रम व्हिडिओ रूपामध्ये माझ्या ताराराणी शिक्षण प्रवाह या यूट्यूब चैनल वर अपलोड असल्यामुळे माझ्या चैनल च्या माध्यमातून हा उपक्रम राज्यातील सर्व उपक्रम शिक्षकांना तसेच पालकांनाही पहावयास मिळेल व मार्गदर्शके ठरेल अशी मी अशा व्यक्त करते.

तसेच काही विद्यार्थिनींचे लेखन हे फोटो काढून त्यांचे पीडीएफ बनविण्यात आली आहे .तसेच ही पीडीएफ शाळेच्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठविण्यात आली. तसेच या पीडीएफचे क्यू आर कोड तयार करून ते शाळेच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात आले. त्यामुळे शाळेला भेट देणाऱ्या व्यक्तींनाही हे क्यू आर कोड स्कॅन करून स्मार्ट शब्दांजली उपक्रम जाणून घेण्यात येऊ लागला.

हा उपक्रम जसा मराठी विषयामध्ये आहे तसाच हा उपक्रम इंग्रजी विषयांमध्येही घेतल्यास इंग्रजी, हिंदी विषयाची शब्द संपत्ती वाढण्यास खूपच मदत होईल.

# ८. संदर्भसूची व परिशिष्टे

## संदर्भसूची


१. बापट भा.गो.शैक्षणिक कृती संशोधन. पुणे. नूतन प्रकाशन

२. व.जा.साळी व सुरेश करंदीकर(२००६) कृती संशोधन व नवोपक्रम कोल्हापूर. फडके प्रकाशन.

३. डॉ.चंद्रकांत वर्तक(२०००) संशोधनातील लेखन शैली. नाशिक.य.च.म.मु.विद्यापीठ.

४. डॉ. अनंत जोशी व सौ संजीवनी महाले, संशोधन अहवाल लेखन पद्धती, नाशिक.य.च.म.मु. विद्यापीठ.


अध्ययन निष्पत्ती पुस्तिका

मा. शिंगणे सरांचे युट्युब वरील व्हिडिओ

अध्ययन निष्पत्ती पुस्तिका

मागील नवोपक्रमांचे आराखडे

परिशिष्टे-

तारारणी विद्यापीठाचे, प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर.

सन-२०२२-२३

इयत्ता - दुसरी    विषय - मराठी    पूर्व चाचणी    गुण-१०

विद्यार्थिनीचे नाव ______________________ ह.क्र.

शाळेचे नाव ______________________

प्र.१. चित्र पाहून शब्द लिहा. ३ गुण



______________________

प्र.२. अर्थपूर्ण शब्द तयार करून लिही.

३ गुण

अ) म र न हा ग – ______________

आ) र मो टा – ______________

इ) ण ती ग प- ______________

प्र.३. चित्राचे निरीक्षण कर. काय दिसते ते लिही. ४ गुण



______________________

______________________

______________________

______________________

तारारणी विद्यापीठाचे, प्रिन्स शिवाजी विद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर.

**सन-२०२२-२३**

**इयत्ता - दुसरी      विषय - मराठी      उत्तर चाचणी      गुण-१०**

**विद्यार्थिनीचे नाव** ____________________

**ह.क्र.**

**शाळेचे नाव** ____________________

**प्र.१. चित्र पाहून शब्द लिहा.** **३ गुण**



____________________

**प्र.२. अर्थपूर्ण शब्द तयार करून लिही.** **३ गुण**

**अ) ल बा ती र भा–** ____________________

**आ) ल गा डी बै–** ____________________

**इ) य वि द्या ल -** ____________________

**प्र.३. चित्राचे निरीक्षण कर. काय दिसते ते लिही.** **४ गुण**



____________________

____________________

____________________

____________________

____________________


तरंगते वाचनालय
पुल्लिंग
तो मुलगा
स्त्रीलिंग
ती मुलगी


तरंगते वाचनालय
तो मुलगा
ते झाड

**विद्यार्थिनींनी लिहिलेल्या हस्तलिखिताचे प्रकाशन विद्यार्थिनींच्याच हस्ते केले.**



**स्वयंअध्ययन कशर्डे- यावरील क्यू आर कोड स्कॅन करून स्वतः घरी अभ्यास करू शकतो.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कोट | झोका | मोठा | झोपडी | आजोबा |
| कोळी | टोपी | लोक | टोपली | झोपाळा |
| खोली | डोळा | लोभी | तोरण | मोदक |
| खोटा | थोडा | शोभा | धोतर | लोकर |
| गोरा | दोर | सोने | नोकर | लोहार |
| गोड | धोबी | सोटा | पोपट | वाटोळा |
| गोठा | नको | होय | पोलीस | सोबती |
| घोडा | पोट | होडी | पोषाख | सोनार |
| चोर | पोथी | कोयना | फोडणी | हातोडा |
| चोळी | फोड | कोळसा | बायको | आगबोट |
| छोटा | बोट | खोकला | बोकड | खोडकर |
| जोडा | फोटो | गोसावी | भोवरा | दररोज |
| जोर | बोर | गोपाळ | भोपळा | ब |
| झोप | बोका | गोफण | मोटार | सो |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| खिळा | शिळा | जिराफ | पिसारा | सदाशिव |
| चिमा | हिरा | इनाम | विजय | सिताफळ |
| जिजा | दिशा | कपिला | इसाक | रविवार |
| जिना | निळा | कविता | इतर | विनायक |
| ढिला | फिका | गणित | पिवळा | शिवराम |
| दिवा | भिक्षा | हरिण | विधाता | शनिवार |
| आणि | भिवा | हिरवा | लिलाव | हिरवळ |
| विडा | रवी | हिवाळा | दिवस | चिवचिव |
| किडा | गिधाड | शिवण | किनारा | बळिराम |
| खिसा | चिखल | शिकार | ठिकाण | अधिकार |
| टिळा | चिमटा | शिक्षक | निशाण | खिरापत |
| विळा | किरण | टिळक | शिरा | इमारत |
| रिक्षा | किसन | विमल | शिवा | अभि |
| शिक्षा | चिवडा | विचार | पिता | |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| साधु | उलटी | कुमुद | फुकट | गुलुगुलु |
| सुटी | उपास | सुपित | झुणका | गुरुवार |
| फुगा | उजवा | गुलाब | तुकडा | बुधवार |
| मुळा | उदार | गुलाल | तुळस | उदाहरण |
| मुका | कुमार | घुबड | तरुण | खुळखुळा |
| सुई | कुदळ | चतुर | दुसरा | गुपचुप |
| सुरी | खुशाल | झुरळ | दुपार | मुकुट |
| उशी | उघडा | पुजारी | नुसता | रुणझुणु |
| उडी | उचकी | पाहुणा | रुपया | उकिरडा |
| चुना | उधार | फुगडी | रुमाल | मुसळ |
| पुडा | उदास | सुबक | सुमन | मनुका |
| पुरी | उकाडा | सुपारी | दुकान | मधुकर |
| उनाड | कुशल | सुतार | पुरुष | तुकाराम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अभय | ॲप | खत | ठग | पळ | लप |
| अमर | ॲपल | खडक | डफ | पपई | वर |
| आग | ऐक | गर | डर | फळ | वजन |
| आज | ऐरण | गवत | ढग | फणस | शहर |
| इतर | ओठ | घर | ढकल | बस | शपथ |
| इसम | ओम | घर | तळ | बदक | षट् |
| आई | ऑल | चल | तबक | भर | सण |
| सई | ऑगस्ट | चटक | थर | भरत | सहल |
| उखळ | औत | छत | दम | मग | हरण |
| उसळ | औषध | छगन | दळण | मगर | हळद |
| ऊस | अंक | जग | धर | यज्ञ | क्षण |
| ऊठ | अंगण | जलद | धरण | यश | पक्ष |
| एक | कप | टब | नळ | रथ | |
| एकदम | कमळ | टक | नरम | रबर | |




**बनविलेल्या व्हिडिओचे क्यू आर कोड द्वारे प्रसिद्ध केले**

पालकांनी हा स्मार्ट शब्दांजली उपक्रम पाहून अनेक प्रोत्साहनपर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्या खालील प्रमाणे सादर केले आहेत.



**स्मार्ट शब्दांजली हस्तलिखिताचे विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रकाशन**



**नाट्य वाचन स्पर्धा**

**मी मैदान बोलतोय हे नाट्य वाचन सादर करून प्रथम क्रमांक मिळविला.**

